| CNR- MHSN030030332024 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :: | २०/०९/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | :: | २०/०९/२०२४ |
| | निकाल दिनांक | :: | ०६/०८/२०२६ |
| | कालावधी | :: | ०१व., १०म., १७दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्रमांक १), सांगली.**

**(पीठासीन अधिकारी : अभिजीत ना. गायकवाड)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७२२/२०२४ निशाणी–३५**

**प्रथम खबर/गुन्हा आणि पोलीस ठाणे**

सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन, गुन्हा क्र. १७४/२०२४, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ४२७ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र सरकार,**<br>द्वारा पोलीस ठाणे अंमलदार,<br>**सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन,**<br>सांगली, ता. मिरज, जि. सांगली. |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | **श्रीमती अ.दि.पाटील.** |
| **आरोपी** | **राज अनुप मंडल,**<br>वय –२३ वर्षे, धंदा– शिक्षण,<br>रा. रणझुंजार चौक, गावभाग, सांगली,<br>ता. मिरज, जि. सांगली. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | **श्री. ए. बी. बसुगडे** |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक. | ०५.०६.२०२४ |
| गुन्हा दाखल झाल्याचा दिनांक. | ०६.०६.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक. | २०.०९.२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक. | २१.१०.२०२४ |
| प्रकरण पुराव्याला निश्चित केल्याचा दिनांक. | १८.११.२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक. | ०६.०८.२०२६ |
| आदेश दिल्याची दिनांक, इतर काही. | ०६.०८.२०२६ |

**आरोपी बाबतचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख. | जामिनावर सोडल्याची तारीख. | दाखल गुन्हा | शिक्षा किंवा दोषमुक्त केले? | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान तुरुंगात असल्याचा कालावधी कलम ४२८ फौ.प्र.स. साठी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राज अनुप मंडल** | दि.०८.०६.२०२४ रोजी सीआरपीसी कलम ४१ (अ) (१) प्रमाणे नोटीस दिली. | २५.११.२०२४ | भा.दं.वि.स. कलम २७९, ४२७ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये. | निर्दोष. | निरंक | निरंक |

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:08:09 +0530

## : न्यायनिर्णय :

(दिनांक ०६ ऑगस्ट, २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ४२७ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ या अपराधांची संपरिक्षा चालविण्यात आली.

०२. अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, दि. ०५/०६/२०२४ रोजी रात्री ११.३० वाजता फिर्यादी रामचंद्र जोतीराम माळी हा त्याच्या ताब्यातील ट्रक एम एच १२ ए आर १५८८ मध्ये जळाऊ लाकूड भरुन नागपूर–रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरुन जात होता. तो धामणी ते अंकली गावाच्या पुढे, विठ्ठल पाटील कॉलेजपासून अंदाजे ०१ कि.मी. अंतरावर आला असता पाठीमागून पांढरी फॉक्सवॅगन कंपनीची पोलो कार जिचा क्र. एम एच १० सी एन ०६०९ भरधाव वेगात आली. आरोपी त्या कारचा चालक होता. त्याने सदर कार हयगयीने बेदरकारपणे ट्रकच्या डाव्या बाजूने ओव्हरटेक करत असताना ट्रकच्या समोरील डाव्या बाजुच्या चाकास जोरदार धडक दिली. त्यामध्ये ट्रकचे टायर फुटून आणि स्टेअरिंग रॉड तुटून नुकसान झाले. सदर अपघातामध्ये कारचे बोनेट बंपर, हेडलाईट, इंडिकेटर व पाठीमागील काच फुटून नुकसान झाले. सदर अपघातास आणि वाहनांच्या नुकसानीला आरोपी कारणीभूत असल्यामुळे फिर्यादीने त्याचे विरुद्ध सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दिली.

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:08:03 +0530

०३. सदर फिर्यादीच्या तक्रारीच्या अनुषंगाने सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १७४/२०२४ हा भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ४२७ आणि मोटर वाहन

कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक ए. एस. पाटील यांच्याकडे सदर गुन्ह्याचा तपास देण्यात आला. त्यांनी तपासादरम्यान वाहनांचे यांत्रीक व तांत्रीक तपासणी प्रमाणपत्र, आय.आर.ए.डी. फॉर्म, फिर्यादी व आरोपीच्या वाहन चालविणेच्या परवान्याची प्रत, फिर्यादी व आरोपी यांना त्यांच्या ताब्यातील वाहन परत केलेबाबतची पावती इत्यादी कागदपत्रे हस्तगत केली. या प्रकरणामध्ये घटनास्थळ पंचनामा पोलीस हेड कॉन्स्टेबल रविंद्र वांगेकर यांनी केला. सदरचे सर्व दस्तऐवज तपासाकामी तपासिक अधिकारी पोलीस नाईक श्री. ए. एस. पाटील यांच्याकडे देण्यात आले. तपासिक अधिकारी यांनी साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पूर्व पीठासीन अधिकारी यांनी नि.क्र. ९ वर भारतीय दंड विधान कलम २७९, ४२७ व मोटर वाहन कायदा कलम १८४ या अपराधांचा दोषारोप निश्चित केला. तो आरोपीला वाचून व समजावून सांगितला असता, आरोपीने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे तीन साक्षीदार तपासणेत आले.

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH Date: 2026.08.06 18:07:58 +0530

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| अभि. सा.क्र.१ | विनोद सोमनाथ बंटनूर | घटनास्थळ पंचनामा साक्षीदार | २३ |

| | | | |
|---|---|---|---|
| अभि. सा.क्र.२ | अजय सदाशिव माने | घटनास्थळ पंचनामा साक्षीदार | २६ |
| अभि. सा.क्र.३ | रामचंद्र जोतीराम माळी | फिर्यादी | २९ |

**ब. आरोपी (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालय (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाने/आरोपीने/न्यायालयाने सिध्द झालेली/निशाणी पडलेली कागदपत्रे**

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | पी२/पीडब्ल्यू २ | घटनास्थळ पंचनामा |

GAIKWAD ABHIJIT NAGNATH

Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH Date: 2026.08.06 18:07:46 +0530

**ब. बचावपक्ष**

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३३ | ट्रक एम एच १२ ए आर १५८८ या वाहनाचा यांत्रीक तपासणी अहवाल |
| २. | निशाणी क्र. ३२ | फॉक्सवॅगन कंपनीची पोलो कार क्र. एम एच १० सी एन ०६०९ या वाहनाचा यांत्रीक तपासणी अहवाल |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**०५.** आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध झाल्याने त्याचे फौ. प्र. सं. कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नि.क्र. ३४ वर नोंदविण्यात आले. खोटी केस केली असल्याचा बचाव आरोपीने घेतला.

**०६.** दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, त्यांनी अभिलेखावर आणलेला पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, दिनांक ०५/०६/२०२४ रोजी रात्री ११.३० वाजणेचे सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ वर मिरज ते अंकली दरम्यान, विठ्ठल पॉलिटेक्निक कॉलेजपासून १ किमी अंतरावर, आरोपीने त्याच्या ताब्यातील फॉक्सवॅगन कार क्र. | **नकारार्थी** |

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:07:34 +0530

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | एम. एच. १० सी एन ०६०९ रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, निष्काळजीपणे, भरधाव वेगात, स्वतःच्या व इतरांच्या जीवितास धोका उत्पन्न होईल अशी चालवून, फिर्यादी चालवत असलेल्या टाटा कंपनीचा ट्रक क्र. एम एच १० ए आर १५८८ यास डाव्या बाजुने ओव्हरटेक करताना धडक देऊन अपघात केला व त्यायोगे भा. द. वि. स. कलम २७९ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| २. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त चार चाकी वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून फिर्यादी चालवत असलेल्या उपरोक्त टाटा कंपनीचा ट्रकला डाव्या बाजुने ओव्हरटेक करताना धडक देऊन अपघात केला व दोन्ही वाहनांचे अंदाजे रक्कम रूपये १,००,०००/- चे नुकसान करुन भा.द.वि. कलम ४२७ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष हे सिद्ध करतो काय की, वरील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद चार चाकी वाहन जागेचे स्वरुप, स्थिती व वापर यांकडे दुर्लक्ष करुन आणि मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल अशा पद्धतीने हयगयीने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवले व त्यायोगे मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ प्रमाणे गुन्हा केला? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करणेत येते. |

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:07:30 +0530

# कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीताः–**

०७. उपरोक्त मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत घेण्यात आले आहेत. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा आणि अपघातग्रस्त वाहनांचे यांत्रीक तपासणी अहवाल मान्य करण्यात आलेले आहेत. सदर अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये दोन्ही वाहनांचे अंदाजे नुकसान उल्लेखलेले आहे. त्यामध्ये वाहनांची यांत्रीक तपासणी झाली असा बोध होत नाही. तथापि, घटनास्थळ पंचनामा मान्य करण्यात आला असल्यामुळे अपघात नागपूर–रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावर धामणी ते अंकली दरम्यान वाहन ट्रक एम एच १२ ए आर १५८८ आणि फॉक्सवॅगन कंपनीची पोलो कार क्र. एम एच १० सी एन ०६०९ यांच्यामध्ये झाला होता हे स्पष्ट होते. सबब, वाहनांचे अंदाजित नुकसान मान्य करण्यात आल्यामुळे अपघातामध्ये कारचे रक्कम रुपये १,७०,०००/– आणि ट्रकचे रक्कम रुपये ६,२००/– नुकसान झाले हे सिद्ध होते. त्यामुळे सदर अपघातासाठी व वाहनांच्या नुकसानाकरिता आरोपी जबाबदार होता का हे तपासणे आवश्यक आहे.

०८. अभियोगपक्षाला साक्षीदार क्र. १ च्या तपासणीमध्ये घटनास्थळ पंचनामा सिद्ध करता आला नसला तरी तो अभियोगपक्षाने पंच साक्षीदार अजय माने याच्या साक्षीपुराव्यातून सिद्ध केलेला आहे. तसेही घटनास्थळ पंचनाम्याबाबत बचावपक्षाचा आक्षेप नाही. अभियोगपक्षाच्या एकंदरित हकीकतीवरुन घटना रात्री राष्ट्रीय महामार्गावर घडलेली होती आणि फिर्यादी हा घटनेतील एकमेव आणि प्रमुख साक्षीदार होता. सबब, अभियोगपक्षासाठी फिर्यादीचा साक्षीपुरावा महत्वपूर्ण होता. फिर्यादीने त्याच्या

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:07:25 +0530

साक्षीपुराव्यात कथन केले की, दि. ०६.०७.२०२४ रोजी रात्री ११.०० वाजता तो सदर ट्रक घेऊन मिरज–अंकली रस्त्यावर जात असताना जांभळी फाट्याच्या पुढे त्यावेळी त्याच्या ट्रकला पाठीमागून आलेल्या गाडीने ट्रकच्या समोरील डाव्या बाजुला धडक दिली. अपघात कसा झाला आणि अपघातासाठी कोण जबाबदार होते हे फिर्यादीला सरतपासामध्ये सांगता आले नाही. अभियोगपक्षातर्फे फिर्यादीला उलटतपाससुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामध्ये अभियोगपक्षाला आरोपीविरुद्ध कोणताही ठोस गुन्हादर्शक पुरावा पटलावर आणता आला नाही. त्याच्या पुराव्यातून अपघातासाठी कार चालकाची चूक होती आणि तो कार चालक आरोपी आहे असे पटलावर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि, त्याने उलटतपासामध्ये मान्य केले की, घटनेच्या वेळी पूर्ण अंधार होता, घटनेनंतर त्याने घटनास्थळी आरोपीला पाहिले नव्हते. आरोपीनेच त्याच्या ट्रकला धडक दिली हे त्याला ठामपणे सांगता येणार नसल्याचे त्याने उलटतपासामध्ये मान्य केले. फिर्यादीच्या एकंदरित साक्षीपुराव्यावरुन अपघाताची घटना सिद्ध होत असली तरी सदर अपघातासाठी आरोपी जबाबदार होता हे सिद्ध होत नाही. सबब, वाहनांच्या झालेल्या नुकसानीकरिता देखील आरोपीला जबाबदार धरता येणार नाही. सदर कारणांमुळे मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीताः</u>–**

**०९.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षांवरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. संचिकेचे अवलोकन केले असता, तपासिक अधिकारी यांनी तपासादरम्यान काहीही जप्त केलेले नाही असे दिसून येते. मुद्दा क्र. १ ते ३ च्या निष्कर्षांवरुन मुद्दा क्र. ४ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:07:21 +0530

## आदेश

१. आरोपी **राज अनुप मंडल** यास भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ४२७ आणि मोटर वाहन कायदा कलम १८४ या शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र सादर करावे. सदर बंधपत्र आदेश तारखेपासून सहा महिने कालावधीकरिता अंमलात असेल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित करण्यात आला)**

GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Digitally signed by GAIKWAD ABHIJIT NAGNATH
Date: 2026.08.06 18:07:14 +0530

**सांगली**
**दिनांक: ०६/०८/२०२६.**

**(अभिजीत ना. गायकवाड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**(न्यायालय क्र.१), सांगली.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. G. Sabale (Grade- II) |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Sangli |
| Date | : | 06.08.2026 |
| Signed by P. O. on | : | 06.08.2026 |
| Uploaded on | : | 06.08.2026 |